पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १५

**सभावृत्तांत**

दिनांक - **२०/०३/२०१५** वेळ – दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२०/०३/२०१५** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
४) मा. बो-हाडे अरुण तुकाराम
५) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
७) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन आणि जे.सी.बी.पुरविणेबाबत – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड मनपाच्या ड प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटामाती भरणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड मनपाच्या क प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटामाती भरणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड मनपाच्या ब प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटामाती भरणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) कै.यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यानाची दुरुस्ती करणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) दिघी गायरान सर्व्हे नं.७७ येथील जागेवर मनपाने १५ वर्षापूर्वी झाडे लावली आहेत त्यास तार फेन्सींग करणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर येथे अंतर्गत जलनि:सारण नलिका टाकणेबाबत – मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे, यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) प्रभाग क्रमांक ८ टेल्को रस्ता हॉटेल वैशाली जवळ तरंगत्या लोकसंख्येसाठी स्वच्छतागृह बांधणेबाबत –मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) प्रभाग क्रमांक २८ अ मधील डांबरीकरण करणेचे स्थळ बदलणेबाबत – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) सभा आयोजनाबाबत – मा.शकुंतला बनसोडे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा.शकुंतला बनसोडे

मा.विधी समितीची दिनांक २०/०३/२०१५ ची पाक्षिक सभा कार्यपत्रिका क्र.१५ गुरुवार दिनांक २६/०३/२०१५ रोजी दुपारी ३.१५ वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

**सभापती -** गुरुवार दिनांक २६/०३/२०१५ रोजी दु.३.१५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

----------

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

( दिनांक २०/०३/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **२६/०३/२०१५** वेळ – दुपारी **३.१५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक २०/०३/२०१५ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **२६/०३/२०१५** रोजी दुपारी **३.१५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
४) मा. बो-हाडे अरुण तुकाराम
५) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

ठराव क्रमांक : ८८ विषय क्रमांक : १
दिनांक : २६/०३/२०१५ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जा.क्र./ड/पा.पू./१/कावि/१०/२०१५, दि.०९/०२/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलक्षेत्र क्र.ड/काळेवाडी मध्ये पाण्याच्या टाकीचे वितरण व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी डिझाईननुसार नविन पाईपलाईन पुरविणे व टाकणे या कामाचे आदेश क्रमांक ७/१०३- २०१३-१४ दि.२७/०१/२०१४ नुसार कामाचे आदेश दिले आहेत. सदर कामाची निविदा र.रु.२१,००,८४०/- इतकी आहे. आतापर्यंत र.रु.१६,४३,४३५/- इतका खर्च झाला आहे. काळेवाडी येथील विजयनगर क्षेत्रातील ओंकार कॉलनी, समर्थ कॉलनी, स्वामी समर्थ कॉलनी, वैभव कॉलनी इ.भागात दुषीत पाण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. सदर भागातील पाण्याच्या पाईपलाईन २५ वर्षापेक्षा जुन्या असल्याने तसेच शीस्याचे जोड असलेने तसेच पाईपलाईन खोलवर असल्याने दुरुस्ती करणे अवघड आहे. या पार्श्वभूमीवर सदर भागात नविन पाईपलाईन तातडीने टाकणे आवश्यक आहे. सदर भागातील परिस्थीती कामाची निकड लक्षात घेता हे काम वरील कामातून करुन घेणे आवश्यक आहे. या बाबींचा विचार करुन जलक्षेत्र क्र.ड/काळेवाडी मध्ये पाण्याच्या टाकीचे वितरण व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी डिझाईननुसार नवीन पाईपलाईन पुरविणे व टाकणे या कामातून विजयनगर क्षेत्रातील

ओंकार कॉलनी, समर्थ कॉलनी, स्वामी समर्थ कॉलनी, वैभव कॉलनी इ.भागात पाईपलाईन टाकणेचे काम करुन घेणेस व सदर कामास र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) ची सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ८९ विषय क्रमांक : २

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.५ मध्ये अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन आणि जे.सी.बी. पुरविणे नि.नो.क्र. २/१-२०१३-१४ अन्वये येणा-या अंदाजे र.रु.१७,००,२४०/- (अक्षरी र.रु.सतरा लाख दोनशे चाळीस फक्त) चे खर्चाचे पुर्वगणनपत्रास सुधारित प्रशासकीय मान्यता व त्या प्रमाणे काम करणेस तसेच प्रभाग क्र.५ मध्ये अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन व जेसीबी पुरविणेकामीचे अंदाजे र.रु.१७,००,२४०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच ठराव क्र.२४ दिनांक २०/०८/२०१४ चा ठराव दुरुस्त करणेत येत आहे. तरी या विषयाला सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९० विषय क्रमांक : ३

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान / वृक्षसंवर्धन / स्थापत्य विभागामार्फत मनपाचे सर्व प्रभागाचे कार्यक्षेत्रात साधारण मे महिन्यापासून विविध ठिकाणी वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटामाती भरणे या कामी प्रत्येक प्रभागाने सुमारे र.रु.१०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन निविदा कार्यवाही करणेकामी मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांनी त्यांचेकडील पत्र क्र.उद्यान/४/कावि/९५/२०१४, दिनांक ०२/०५/२०१४ अन्वये कळविले होते व निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती. ड प्रभागाचे विषयांकित काम ठेकेदार मे.एस.एस. कन्स्ट्रक्शन यांना मिळाले असून कामाचा आदेश दिलेनंतर काम चालू असताना सन्मा. नगरसदस्य यांच्या वाढीव कामाच्या मागणीनुसार मुळ निविदा रकमेपेक्षा र.रु.८,३३,२४७/- इतक्या वाढीव खर्चाचे काम करुन घेणेत आलेले आहे. त्यानुसार र.रु.१७,६६,९५४/- चे सुधारीत खर्चाचे अंदाजपत्रक विभागाने तयार केलेले आहे. विषयांकित कामाचे रु.रु.१७,६६,९५४/- (अक्षरी र.रु.सतरा लाख सहासष्ट हजार नऊशे चौप्पन्न फक्त) चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ९१ विषय क्रमांक : ४

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान / वृक्षसंवर्धन / स्थापत्य विभागामार्फत मनपाचे सर्व प्रभागाचे कार्यक्षेत्रात साधारण मे महिन्यापासून विविध ठिकाणी वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटामाती भरणे या कामी प्रत्येक प्रभागाने सुमारे र.रु.१०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन निविदा कार्यवाही करणेकामी मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांनी त्यांचेकडील पत्र क्र.उद्यान/४/कावि/९५/२०१४, दिनांक ०२/०५/२०१४ अन्वये कळविले होते व निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती. क प्रभागाचे विषयांकित काम ठेकेदार मे.एस.एस. कन्स्ट्रक्शन यांना मिळाले असून कामाचा आदेश दिलेनंतर काम चालू असताना सन्मा. नगरसदस्य यांच्या वाढीव कामाच्या मागणीनुसार मुळ निविदा रकमेपेक्षा र.रु.८,०९,२८६/- इतक्या वाढीव खर्चाचे काम करुन घेणेत आलेले आहे. त्यानुसार र.रु.१७,४२,६९६/- चे सुधारीत खर्चाचे अंदाजपत्रक विभागाने तयार केलेले आहे. विषयांकित कामाचे रु.रु.१७,४२,६९६/- (अक्षरी र.रु.सतरा लाख बेचाळीस हजार सहाशे शहाण्णव फक्त) चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९२ विषय क्रमांक : ५

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान / वृक्षसंवर्धन / स्थापत्य विभागामार्फत मनपाचे सर्व प्रभागाचे कार्यक्षेत्रात साधारण मे महिन्यापासून विविध ठिकाणी वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटामाती भरणे या कामी प्रत्येक प्रभागाने सुमारे र.रु.१०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन निविदा कार्यवाही करणेकामी मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांनी त्यांचेकडील पत्र क्र.उद्यान/४/कावि/९५/२०१४, दिनांक ०२/०५/२०१४ अन्वये कळविले होते व निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती. ब प्रभागाचे विषयांकित काम ठेकेदार मे.एस.एस. कन्स्ट्रक्शन यांना मिळाले असून कामाचा आदेश दिलेनंतर काम चालू असताना सन्मा. नगरसदस्य यांच्या वाढीव कामाच्या मागणीनुसार मुळ निविदा रकमेपेक्षा र.रु.६,३७,१४२/- इतक्या वाढीव खर्चाचे काम करुन घेणेत आलेले आहे. त्यानुसार र.रु.१५,७०,५५२/- चे सुधारीत खर्चाचे अंदाजपत्रक विभागाने तयार केलेले आहे. विषयांकित कामाचे रु.रु.१५,७०,५५२/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख सत्तर हजार पाचशे बावण्ण फक्त) चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९३ विषय क्रमांक : ६

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यानाची संरक्षण भिंत व तार फेन्सींग मोडकळीस आलेने चो-यांचे प्रमाणे वाढले आहे. कै.यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यानातील नाल्याकडील उर्वरित आर.सी.सी. भिंत बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेचे काम निविदा क्र.२८/५/२०१२-१३ (निविदा र.रु.२२,००,०००/- मे.कुबेरा एंटरप्राईजेस, संत तुकारामनगर, पिंपरी यांचे मार्फत सुरु आहे. सदर कामामध्ये या उद्यानाच्या रस्त्याकडील बाजूचे मोडकळीस आलेले फेन्सींग काढून सिमाभिंत बांधणे आवश्यक असलेने सिमाभिंत बांधून त्यावर तार फेन्सींग करणे व उद्यान विकसित करणेसाठीचे काम करणेकामी येणारा वाढीव खर्चासह र.रु.४९,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी निविदा क्र.२८/५/२०१२-१३ चे एकूण खर्च र.रु. ४९,५०,०००/- चे वाढीव खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९४ विषय क्रमांक : ७

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दिघी गायरान सर्व्हे नं.७७ येथील जागेवर १५ वर्षापूर्वी झाडे लावलेली आहे. सदर ठिकाणी संरक्षण भिंत नसल्याने दिघी गायरान सर्व्हे नं.७७ येथे तार फेन्सींग कंपाऊंड करणेचे काम निविदा क्र.२०/२९-२०१३-१४ (निविदा र.रु. २८,०१,१२०/-) मे.कुबेरा एंटरप्राईजेस, संत तुकारामनगर, पिंपरी यांचे मार्फत सुरु आहे. सदर कामातून भोसरी आळंदी रस्त्याचे डाव्या सिमाभिंत बांधून त्यावर तार फेन्सींग करणे व उद्यान विकसित करणेसाठीचे काम करणेकामी येणारा वाढीव खर्चासह र.रु.४९,९०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख नव्वद हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी निविदा क्र.२०/२९/२०१३-१४ चे एकूण खर्च र.रु. ४९,९०,०००/- चे वाढीव खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९५ विषय क्रमांक : ८

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.३७ येथे बालाजीनगर झोपडपट्टी असून सदर झोपडपट्टीत सार्वजनिक शौचालये अपुरे आहेत. त्यामुळे तेथील झोपडपट्टीधारक उघडयावर जातात त्यामुळे सदर ठिकाणी अनारोग्य परिस्थीती निर्माण होत आहे. सदर झोपडपट्टीधारकांना वैयक्तीक शौचालये

बांधणेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी झोपडपट्टी अंतर्गत रस्त्यावर जलनि:सारण नलिका टाकणे आवश्यक आहे. सदरचे काम कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर येथे अंतर्गत जलनि:सारण नलिका टाकणे या कामातून करुन घेणेस येणारा सुधारीत अंदाजित र.रु.४९,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त) चे खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९६ विषय क्रमांक : ९

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.८ टेल्को रस्ता हॉटेल वैशालीजवळ तरंगत्या लोकसंख्येसाठी स्वच्छतागृह बांधणेचे काम प्रस्तावित करणेत आलेले आहे. परंतु सदर ठिकाणी संडासब्लॉकचा वापर अजिबातच होणार नाही. त्या ठिकाणी नागरीवस्ती नाही किंवा तरंगती लोकसंख्या देखील नाही उलट त्या ठिकाणी संडासब्लॉक बांधल्यास त्याचा दुरुपयोग होईल. सदर ठिकाणी संडासब्लॉक न बांधता अतिशय आवश्यकता असलेल्या परशुराम झोपडपट्टी या ठिकाणी संडासब्लॉक बांधावा जेणेकरुन त्याचा पुरेपुर उपयोग होईल. सदरची बाब दि.१३/११/२०१४ च्या मा.आयुक्त यांचे वॉर्डाची पाहणी दौ-यात मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून दिलेली आहे. वॉर्डमध्ये परशुराम चौक लगत असलेल्या परशुराम झोपडपट्टीमध्ये अस्तीत्वात असलेल्या संडासब्लॉकचा परिसरातील नागरिक वापर करीत आहेत. तथापि सदर संडासब्लॉक कमी सिटस् चा असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे बरेचशे नागरिक उघडयावर शौचास बसत आहेत. परिणामी परिसरामध्ये नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. सदर संडासब्लॉकची क्षमता वाढविणे आवश्यक असल्याने प्रभाग क्र.८ टेल्को रस्ता हॉटेल वैशालीजवळ तरंगत्या लोकसंख्येसाठी स्वच्छतागृह बांधणे ऐवजी परशुराम झोपडपट्टी या ठिकाणी संडासब्लॉक बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९७ विषय क्रमांक : १०

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव -

संतोषीमाता चौक ते हॉटेल एम्पायर गार्डन पर्यंतच्या रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे या कामातून (नि.क्र.१७/२७-२०१४-१५ मधून) उद्यमनगर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणेस तसेच प्रभाग क्र.२८ (एफ २ ब्लॉक) येथे टेल्को मटेरिअल गेट ते प्राधिकरण उड्डाण पुल व परिसर लगत रस्त्याचे डांबरीकरण करणे नि.क्र.१७/०९-२०१४-१५ या कामातून मासुळकर कॉलनी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणेस तसेच यशवंतनगर चौक ते आण्णासाहेब

मगर स्टेडियम पर्यंत रस्ता हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे (नि.क्र.१७/२८-२०१४-१५ या कामातून) अजमेरा कॉलनी परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९८ विषय क्रमांक : ११

दिनांक : २६/०३/२०१५

सुचक : मा.शकुंतला बनसोडे अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.शकुंतला बनसोडे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव -

मा.विधी समिती सभा प्रत्येक महिन्याचे पहिल्या व तिस-या शुकवारी दुपारी १२.०० वा. ऐवजी दुपारी ३.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २७६ /२०१५
दिनांक : २७/०३/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.